## निशानी क्रमांक १ खालील आदेश
## (दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी पारीत)

सदरचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे मय्यत अनुसयाबाई मुरलीधर धारणे यांची मुले व अर्जदार क्र.३ ही मुलगी असून ते त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ ची आई मय्यत अनुसयाबाई मुरलीधर धारणे ही दिनांक ०७.०७.२०२५ रोजी मौजा हळदा ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर येथे मरण पावली. तसेच मयताचे पती व अर्जदारांचे वडील मुरलीधर धारणे हे दि. २४.०४.२०१८ रोजी मरण पावले. तसेच मयताची आई भागुबाई मनिराम चुधरी ही देखील तिच्या मृत्यूपूर्वीच मरण पावली. मय्यत अनुसयाबाई यांना अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत. अर्जदारांना शासकीय तसेच निमशासकीय कामकाजासाठी वारसान प्रमाणपत्राची आवश्यक्ता भासली. म्हणून त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला. अर्ज प्राप्त झाल्यानंतर **नि.क्र.–१८** अन्वये अर्जदार यांचे घराला, नगर परिषद, ब्रम्हपुरी, तहसिल कार्यालय, ब्रम्हपुरी व दिवाणी व फौजदारी न्यायालय, ब्रम्हपुरी यांचे सुचना फलकावर उदघोषणा नोटीस अडकविण्यात आली. मुन्यादी पावती **नि.क्र.–१९** वर बेलीफ यांनी दाखल केली. तसेच दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजी जाहीर नोटीस स्थानिक दैनिक वृत्तपत्र पुण्य नगरी यामध्ये प्रकाशीत करण्यात आली. त्या अनुषंगाने अर्जदारांच्या अर्जावर आक्षेप मागितला असता, कुणीही न्यायालयासमोर हजर होऊन आजपर्यंत अर्जास आक्षेप नोंदविला नाही.

०३. अर्जदार क्र.१ भास्कर मुरलीधर धारणे यांनी **नि.क्र.१** वर दाखल केलेल्या अर्जाशी सुसंगत अशा मजकुराचे शपथपत्र **नि.क्र.११** वर दाखल केले. अर्जदार क्र.१ यांनी शपथेवर कथन केले की, तो स्वतः व ईतर अर्जदार हे मय्यत अनुसयाबाई मुरलीधर धारणे यांचे वारस आहेत. सदर तोंडी पुराव्याचे कथनाच्या पृष्ठर्थ त्यांनी मय्यत अनुसयाबाई मुरलीधर धारणे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत (**नि.क्र.१२**), मय्यत अनुसयाबाई मुरलीधर धारणे यांचे आधार कार्डची पडताळणी प्रत (**नि.क्र.१३**), मय्यत मुरलीधर आकोजी धारणे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत (**नि.क्र. १४**), अर्जदार क्र.१ ते ३ चे आधार कार्डच्या पडताळणी प्रती (अनु.**नि.क्र.१५ ते १७**) व पुण्य

नगरी दैनिकात दिलेला जाहिरनामा व बील (अनु. **नि.क्र.२० व २१**) नुसार असे दस्त दाखल केले.

**०४.** दैनिक वृत्तपत्रातील जाहीर नोटीस, तसेच जाहीरनाम्यानंतर आजपर्यंत प्रस्तुत अर्जास कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जाचे व अर्जदार क्र.१ च्या पुराव्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, मय्यत अनुसयाबाई ही अर्जदार क्र.१ ते ३ ची आई आहे. मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.१२ चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अनुसयाबाई मुरलीधर धारणे ही दि.०७.०७.२०२५ रोजी मय्यत झाली. तसेच निशाणी १४ चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अर्जदारांचे वडील मुरलीधर आकोजी धारणे हे दि. २४.०४.२०१८ रोजी मय्यत झाले. त्यामुळे प्रथमदर्शनी अभिलेखावरील पुराव्यावरून असे दिसून येते की, अर्जदारांशिवाय मय्यत अनुसयाबाई यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. वर चर्चा केल्याप्रमाणे अर्जदार क्र.१ च्या तोंडी पुराव्याचे खंडण झालेले नाही. त्यांच्या पुराव्याबाबत अविश्वास दाखविण्याचे कुठलेही कारण अभिलेखावर नाही. त्यामुळे वरील चर्चेवरुन मी या मतास आलो आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे **मय्यत अनुसयाबाई मुरलीधर धारणे** यांचे कायदेशीर वारस आहेत. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार नामे भास्कर मुरलीधर धारणे, मोरेश्वर मुरलीधर धारणे व मंगला गिरीधर रणदिवे हे **मय्यत अनुसयाबाई मुरलीधर धारणे** यांचे कायदेशीर वारस आहेत, त्यामुळे त्यांच्या हक्कात वारसान प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. अर्जदारांनी योग्य ते न्यायालयीन मुद्रांक अदा करावे.

***सदरचा आदेश हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.***

DNYANESHWAR BHAGWAT GUTTE

Digitally signed by DNYANESHWAR BHAGWAT GUTTE
Date: 2026.03.18 17:53:11 +0530

( डी.बी.गुट्टे )

ठिकाण :–ब्रम्हपुरी

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
ब्रम्हपुरी.

दिनांक :– १८/०३/२०२६.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of order are word to word, as per original order.

Name of Stenographer : N. B. Chavhan.